# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक २९/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## लोहा चोरी करणाऱ्या आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक २५/०९/२२ चे ०१.३० वा. ते ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद रामकृष्णा पावडे वय ४५ वर्ष, रा. जामगाव बु. ता. नरखेड जि.नागपुर यांनी पो.स्टे. जलालखेडा येथे रिपोर्ट दिली की, दिनांक २५/०९/२२ चे ०१.३० वा. ते ०२.०० वा. दरम्यान त्यांचे खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट आहे. सध्या पावसाळा सरु असल्याने डांबर प्लान्ट बंद आहे. त्यामुळे तेथील सामान उघडयावर असल्याने तेथे एक चौकीदार ग्यानु जग्गु मुरोलीया, वय ५८ वर्ष, रा. घोगरा याला मगील २० दिवसांपासुन ४,०००/–रु. महीन्याने चौकीदाराचे कामावर सामानावर लक्ष ठेवण्याकरीता ठेवलेला आहे. दि. २५/०९/२२ रोजी सकाळी ०५.३० वा. सुमारास मोरेश्वर फुसे रा. घोगरा याने फिर्यादीला फोनवर माहीती दिली की, रात्री ०१.३० ते ०२.०० सुमारास खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट येथे सामानाची चोरी झाली आहे. या माहिती वरून फिर्यादीने मौजा खापा शिवारात डांबर मिक्सर प्लान्ट येथे फिर्यादीने जावुन पाहीले असता ०१) डी.सी. मोटार १० नग कि. १००,०००/–रु., ०२) १ नग ब्लोअर कि. ७,०००/–रु., ०३) १०० लोखंडी ॲगल तार कपाउड १५,०००/–रु., ४) ट्रसल ६० नग लोखंडी ९०,०००/–रु., ५) चॅनल ९० नग २० फुट लांब १०,०००/–रु., ०६) ३५ नग गडर मोठे प्रत्येकी वजन २० किलो कि. १००,०००/–रु., ०७) एल.डी.ओ पंप २ नग ६,०००/–रु., ०८) ५०० फुट केबल मोठे बंडल ५,०००/–रु., ०९) बॅटीरी मोठी २ नग १०,०००/–रु., १०) मशीनचे पुर्ण बेरींग ८,०००/–रु., ११) गोटी पाना पेटी ५,०००/–रु., १२) पाण्याची ७,०० लिटर प्लॅस्टीक टंकी कि. २,०००/–रु. असा एकुण कि. ३,५८,०००/–रु. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे अप.क्र. ३६६/२०२२ कलम ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचा समांतर तपास सुरू असतांना, दिनांक २९/०९/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथकाला गोपनीय माहिती मिळाली की गुन्ह्यातील लोहा चोरी करणारा इसम हा अमरावती जिल्हाचे हद्दीतील वलगाव त्याच्या राहत्या घरी हजर आहे. त्याचे नाव संदीप ओमकार गडलिंग आहे. अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरुन पथकाने आरोपी नामे– संदीप ओमकार गडलिंग, वय ४३ वर्ष, रा. वलगाव अमरावती याला ताब्यात घेवून विचारपूस केली असता आरोपीने उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्याचेवर संशय बळावल्याने अधिक विचारपुस केली असता त्याने साथीदार गफुर अब्दुल, कलीम शह तसेच इतर साथीदार सर्व रा. अमरावती यांचे सोबत मिळून जलालखेडा येथील बंद डाबर कंपनी मधील लोहा चोरी केले असल्याचे कबुल केले. आरोपीला पुढील कायदेशिर कार्यवाही करीता पोस्टे जलालखेडा यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पो.उपनि भारत थिटे पोहवा सुनील मिश्रा, मदन असतकर, नापोशि बालाजी, सतीश (सायबर सेल) व मपोना स्वाती हिंडोरिया यांचे पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर